
आरती संग्रह
वास्तु उंबरठा
Vastu Tathastu
वक्रतुण्ड महाकाय सुर्यकोटि समप्रभः ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ।।




विजय निवास, दत्तमंदिर समोर, पाथवली गाव, डोंबीवली (पूर्व)
संपर्क : 9112017191

# आरती गणपतीची

सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नाची।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।।
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची।
कंठी झळके माळ मुक्ताफळांची ।।१।।
जय देव जय देव जय मंगल मुर्ती ।
दर्शनामात्रें मनः कामना पुरती ।। धृ० ।।
रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा।
चंदनाची उटी कुंकुमकेशरा।।
हिरेजडित मुकुट शोभतो बरा।
रुणझुणती नूपुरे चरणीं घारगिया ।। जय०।। २।।
लंबोदर पितांबर फणिबरबंधना।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना।
दास रामाचा वाट पाहे सदना।
संकटीं पावावें निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना ।
जय देव जय देव जय मंगलमुर्ती ।।३।।



# श्री शंकराची आरती

लवथवती विक्राळा ब्रम्हांडी माळा ।।
विषें कंठ काळा त्रिनेत्री ज्वाळा ।।
लावण्य सुंदर मस्तकी भाळा ।।
तेथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझूळां ।।१।।
जयदेव जयदेव जय श्री शंकरा ।।
आरती ओवाळूं तुझ कर्पुरगौरा ।। धृ० ।।
कर्पुरगौरा भोळा नयनीं विशाळा ।।
अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा ।।
विभूतींचे उधळण शितकंठ नीळा ।।
ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ।। जय० ।।२।।
देवीं दैत्य सागरमंथन पैं केले ।।
त्यामाजी अवचीत हळहळ सापडले।
तेत्वां असुरपणे प्राशन केलें ।।
नीलकंठ नाम प्रसिद्ध झाले ।। जय० ।।३।।
व्याघ्रांबर फणिवरधन सुंदर मदनारी ।।
पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी ।।
शतकोटींचे बीज वाचे उच्चारी ।।
रघुकुळटिळक रामदासा अंतरी ।। जय० ।।४।।



# दुर्गादेवीची आरती

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारीं ।।
अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी ।।
वारीं वारीं जन्म मरणांते वारीं ।।
हारीं पडलों आतां संकट निवारीं ।।१।।
जय देवी जय देवी जय महिषासुरमथिनी ।।
सुरवरईश्वरवदे तारक संजीवनी ।। जय० ।। धृ० ।।
त्रिभुवनभुरनीं पहातां तुजऐसी नाही ।।
चारी श्रमले परंतु न बोलावे काही ।।
साही विवाद करीता पडले प्रवाहीं ।।
ते तूं भक्तालागी पावसि लवलाही ।। जय० ।।२।।
प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासा ।।
क्लेशापासुनि सोंडी तोंडी भवपाशा ।।
अंबे तुजवाचून कोण पुरविल आशा ।।
नरहरि तल्लिन झाला पदपंकज लेशा ।। जय० ।।३।।



# आरती श्री विठ्ठलाची

युगे अठ्ठाविस विटेवरी उभा ।। वामांगी रखुमाई दिसे
दिव्य शोभा ।। पुंडलिकाचे भेटी परब्रम्ह आलें गा।।
चरणीं वाहे भिमा उद्धरी जगा ।।१।। जय देव जय देव
जय पांडुरंगा ।। रखुमाई वल्लभा, राईच्या वल्लभा
पावें जिवलगा ।। जय० ।।धृ।। तुळशीमाळा गळां
कर ठेऊनी कंटी ।। कासें पितांबर कस्तुरी
लल्लाटी।। देव सुरवर नित्य येती भेटी ।।
गरुड हनुमंत पुढें उभे रहाती ।। जय० ।।२।।
धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा ।। सुर्वणाती रमळें वनमाळा
गळा।। राऊ रखुमाई राणीया सकळा ।। ओंवाळीती
राजा विठोबा सावळा ।। जय० ।।३।। ओवाळूं आरत्या
कुर्वंड्या येती । चंद्रभागेमाजी सोडुनिया देती ।। दिंड्या
पताका वैष्णव नाचती । पंढरीचा महिमा वर्णावा
किती ।। जय० ।।४।। आषाढी कार्तिकी भक्तजन येती ।
चंद्रभागेमाजीं स्नान जे करती । दर्शनहेळामात्रें तया होय
मुक्ती केशवासी नामदेव भावे ओवाळिती ।।५।।



# आरती श्री विठ्ठलाची

येई हो विठ्ठले माझे माऊली ये।
निढळावरी कर ठेवूनी वाट मी पाहें ।।धृ०।।
आलिया गेलिया हाती धाडी निरोप ।।
पंढरपुरी आहे माझा मायबाप ।। येई०।।१।।
पिवळा पितांबर कैसा गगनीं झळकला ।
गरुडावरि बैसोनी माझा कैवारीं आला ।। येई०।।२।।
विठोबाचे राज्य आम्हा नित्य दिपवाळी।।
विष्णुदास नामा जीवेभावे ओवाळी ।। येई०।।३।।
असो नसो भाव आम्हां तुझिया ठायां ।
कृपादृष्टी पाहे माझ्या पंढरीराया ।।४।।

## आरती श्री ज्ञानदेवाची

आरती ज्ञानराजा। महाकैवल्यतेजा ।
सेविती साधुसंत । मनु वेधला माझा ।। आरती० ।।धृ।।
लोपलें ज्ञान जगीं। हित नेणती कोणी।
अवतार पांडुरंग। नाम ठेविलें ज्ञानी ।।आ० ।।१।।
कनकाचे ताट करीं उभ्या गोपिका नारी।
नारद तुंबरही। साम गायन करी।। आ० ।।२।।
प्रगट गुह्या बोले । विश्व ब्रम्हाचि केलें ।
रामा जनार्दनी। पायीं मस्तक ठेवलें ।।
आरती ज्ञानराजा ।। महा० ।। ३।।

## श्री तुकारामाची आरती

आरती तुकारामा । स्वामी सद्‌गुरुधामा ।
सच्चिनानंदमूर्ति। पाय दाखवी आम्हां।। आरती ।। धुं.।।
राघवे सागरांत। पाषाण तारिले। तैसे हे तुकोबाचे ।
अभंग उदकी रक्षिले ।। आरती ।। १।।
तुकिता तुलनेसी । ब्रह्म तुकासि आले ।।
म्हणुनी रामेश्वरे चरणी मस्तक ठेविलें ।।
आरती तुकारामा ।।२।।

# आरती गणपतीची

शेंदुर लाल चढायों अच्छा गजमुखको ।।
दोंदील लाल बिराजे सुत गौरी हरको ।।
हाथ लिये गुडलड्डू साई सुरवरको ।।
महिमा कहे न जाय लागत हूं पदको ।।१।।
जय जय श्री गणराज विद्यासुखदाता ।।
धन्य तुमारो दर्शन मेरा मन मरता ।।धृ०।।
अष्टौ सिद्धि दासी संकटको बैरी।।
विघ्नविनाशक मंगलमुरत अधिकारी ।।
कोटीसुरजप्रकाश ऐसी छबी तेरी ।।
गंडस्थल मदमस्तक झुले शिशिबिहारी ।। जय०।। २।।
भावभगतसे कोई शरणागत आवे ।।
संतत संपत सबही भरपूर पावे ।।
ऐसे तुम महाराज मोको शतिभावे ।।
गोसावीनंदन निशिदिन गुण गारे ।।३।।



# श्री दत्ताची आरती

त्रिगुणात्मक त्रैमुर्ती दत्ता हा जाणा ।।
त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा ।।
नेति नेति शब्द न ये अनुमाना ।।
सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना ।।
जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता।
आरती ओवाळीतां हरली भवचिंता ।। धृ० ।।
सबाह्या अभ्यंतरी तूं एक दत्त ।।
अभाग्यासी कैंची कळे ही मात।।
पराही परपती तेथे कैंचा हेत ।।
जन्म मरणचा पुरलासे अन्त ।।जय० ।।२ ।।
दत्ता येऊनियां उभा ठाकला।।
सद्भावे साष्टांगे प्रणिपात केला ।।
प्रसन्न होऊनी आशिर्वाद दिधला ।।
जन्म मरणाचा फेरा चुकविला ।।जय० ।।३ ।।
दत्ता दत्त ऐसे लागलें ध्यान ।
हरपलें मन झाले उन्मन ।
मी तीं पणाची झाली बोळवण ।
एका जनार्दनी श्रीदत्तध्यान ।।जय० ।।४ ।।



# आरती दशावताराची

आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म ।।
भक्तसंकटी नाना स्वरुपी स्थापिसी स्वधर्म ।।धृ०।।
अंबऋषीकारणें गर्भवास सोशीसी ।।
वेद नेले चोरुनी बह्म्या आणुनियां देसी ।।
मत्स्यरुपी नारायण सप्तहि सागर धुंडीसी ।।
हस्त लागतां शंखासुर तुझा वर देशी ।। आरती०।।१।।
रसातळासी जाता पृथ्वी पाठीवर घेसी ।।
परोपकारासाठी देवा कासव झालासी।।
दाढें धरुनी पृथ्वी नेतां वराहरुप होसी ।।
प्रल्हादाकारणे स्तंभी नरहरी गुरगुरसी ।। आरती०।।२।।
पांचवे अवतारी बळीच्या द्वाराला जाशी।।
भिक्षे स्थळ मागुनी बळीला पाताळ नेसी ।
सर्व समर्पण केले म्हणुनी प्रसन्न त्या होसी ।।
वामनरुपी धरुती बळीच्या द्वारी तिष्ठसी ।। आरती०।।३।।
सहस्त्रार्जुन मातला जमदाग्नीचा वध केला ।।
कष्टी ते रेणुका म्हणुनि सहस्त्रार्जुन वधिला ।।
निःक्षत्री पृथ्वी दान दिधली विप्राला।।

सहावा अवतार परशुराम प्रगटला ।। आरती० ।।४।।
मातला रावण सर्वा उपद्रव केला ।।
तेहतिस कोटी देव बंदी हरिले सीतेला ।।
पितृवचनालागी रामें वनवास केला ।।
मिळोनी वानरसेना राजा राम प्रगटला ।। आरती० ।।५।।
देवकीवसुदेव बंदीमोचन त्वा केला ।।
नंदाघरी जाऊनी निजसुख गोकुळा दिधलें ।।
गोरसचोरी करिता नवलक्ष गोपाळ मिळविले।।
गोपिकांचे प्रेम देखुनी श्रीकृष्ण भुलले ।। आरती० ।।६।।
बौद्धकलंकी कलियुगी अधर्म हा अवघा ।।
सोडूनी दिधला धर्म म्हणूनी न दिससी देवा ।।
म्लेंच्छामर्दन करिसी म्हणुनि अलंकी केशवा ।।
बहिरवी जान्हवी द्यावी निजसुखानंदसेवा ।। आरती० ।।७।।





# आरती श्री स्वामी समर्थांची

जय देव जय देव जय श्रीस्वामीसमर्था ।
आरती ओंवाळू चरणीं, ठेवूनियां माथा ।। धृ. ।।
छेली-खेडेग्रामीं, तू अवतरलासी । जगदुद्धारासाठीं,
राया तू फिरसी । भक्तवत्सल खरा, तूं एक होसी।।
म्हणुनि शरण आलों, तुझे चरणासी। जय देव. ।।१।।
त्रिगुणपरब्रह्म, तूझा अवतार। त्याची काय
वर्णू लीला पामर ।। शेषादिक शिणले नलगे त्या पार ।
तेथें जडमूढ कैसा, करुं मी विस्तार । जय देव. ।।२।।
देवाधिदेव, तूं स्वामीराया । निर्जर मुनिजन ध्याती,
भावें तव पायां ।। तुजसी अर्पण केली, आपुली ही काया।
शरणागता तारीं, तूं स्वामीराया । जय देव. ।।३।।
अघटित लीला करुनीं जडमूढ उद्धरिले । कीर्ती एकुनि कानीं,
चरणीं मी लोळें ।। चरणप्रसाद मोठा, मज हें अनुभवलें।
तुझ्या सूता नलगे, चरणा वेगळें ।।४।।



# स्वामी तारक मंत्र

।।श्री स्वामी समर्थ ।।

गुरु ब्रम्हा गुरु विष्णू गुरुः देवो महेश्वरा
गुरु शाक्षात परब्रम्हा तस्मै श्री गुरुवे नमः
निशंक होई रे मना,निर्भय होई रे मना।
प्रचंड स्वामीबळ पाठीशी, नित्य आहे रे मना।
अतर्क्य अवधूत हे स्मर्तुगामी,अशक्य ही शक्य करतील स्वामी।।१।।
जिथे स्वामीचरण तिथे न्युन्य काय,स्वये भक्त प्रारब्ध घडवी ही माय।
आज्ञेवीना काळ ही ना नेई त्याला,परलोकी ही ना भीती तयाला
अशक्य ही शक्य करतील स्वामी।।२।।
उगाची भितोसी भय हे पळु दे,वसे अंतरी ही स्वामीशक्ति कळु दे।
जगी जन्म मृत्यु असे खेळ ज्यांचा,नको घाबरू तू असे बाळ त्यांचा
अशक्य ही शक्य करतील स्वामी।।३।।
खरा होई जागा श्रद्धेसहित,कसा होसी त्याविण तू स्वामिभक्त।
आठव! कितीदा दिली त्यांनीच साथ,नको डगमगु स्वामी देतील हात
अशक्य ही शक्य करतील स्वामी।।४।।
विभूति नमननाम ध्यानार्दी तीर्थ,स्वामीच या पंचामृतात।
हे तीर्थ घेइ आठवी रे प्रचिती,ना सोडती तया, जया स्वामी घेती हाती ।।५।।
अशक्य ही शक्य करतील स्वामीअशक्य ही शक्य करतील स्वामी

# आरती साईबाबांची

आरती साईबाबा । सौख्यदातार जीवा।
चरणरजातली । द्यावा दासा विसावा, भक्ता विसावा ।।ध्रु ०।।
जाळुनियां अनंग। स्वस्वरूपी राहेदंग ।
मुमुक्षूजनां दावी । निज डोळा श्रीरंग ।। आ०।। १ ।।
जयामनी जैसा भाव । तया तैसा अनुभव ।
दाविसी दयाघना । ऐसी तुझीही माव ।। आ०।। २ ।।
तुमचे नाम ध्याता । हरे संस्कृती व्यथा ।
अगाध तव करणी । मार्ग दाविसी अनाथा ।। आ०।। ३ ।।
कलियुगी अवतार । सगुण परब्रह्मः साचार ।
अवतीर्ण झालासे । स्वामी दत्त दिगंबर ।। द०।। आ०।। ४ ।।
आठा दिवसा गुरुवारी । भक्त करिती वारी
प्रभुपद पहावया । भवभय निवारी ।। आ०।। ५ ।।
माझा निजद्रव्यठेवा । तव चरणरज सेवा ।
मागणे हेचि आता । तुम्हा देवाधिदेवा ।। आ०।। ६ ।।
इच्छित दिन चातक। निर्मल तोय निजसुख ।
पाजावे माधवा या । सांभाळ आपुली भाक ।। आ०।। ७ ।।

## घालीन लोटांगण

घालीन लोटांगण वंदीन चरण डोळ्यांनी पाहिन रुप तुझें।
प्रेमें आलिंगन आनंदे पुजिन भावें ओवाळिन म्हणे नामा ।।१।।
त्वमेव माता च पिता त्वमेवा बंधुश्च सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव सर्व मम देवदेव ।। २।।
कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा, बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात्।
करोमि यद्यत्सकलं परस्मै नारायणायेति समर्पयामि ।।३।।
अच्युंतं केशवं रामनारायणं कृष्णदामोदरं वसुदेवं हरिम् ।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं जानकीनायकं रामचंद्र भजे ।।४।।
हरे राम हरे रा राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।।५।।

## तूं सुखकर्ता

तूं सुखकर्ता, तूं दुःखहर्ता विघ्नविनाशक मोरया।
संकटी रक्षी शरण तुला मी गणपती बाप्पा मोरया ।।धृ।।
मंगलमूर्ती तूं गणनायक । वक्रतुंड तूं सिद्धिविनायक ।
तुझिया द्वारी आज पातलों। नेई स्थितप्रती राया संकटी ।।१।।
तूं सकळांचा भाग्यविधाता। तूं विद्येचा स्वामी दाता ।
ज्ञाता तूं सर्वस्व जगी या। पामर मी तव गुणी कायनें ।
तुझी आरती गाया । संकटी ।।३।।

# मंत्र पुष्पांजली

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन ।
ते ह नाकं महिमानः सचंत । यत्र पूर्वे साध्याः संति देवाः।
ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ।
स में कामान् कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणे ददातु।
कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः ।।
ॐ स्वस्ति साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्य
राज्यं माहाराज्माधिपत्यमयं समंतपर्या ईस्यात् सार्वभौमः
सार्वयुष आंतादापरार्धात्। पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिति।
तदप्येषश्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन् गृहे।
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वे देवाः सभासद इति।।
एकदन्ताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि तन्नो दंतिः प्रचोदयात् ।।
ॐ एकदन्ताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि तन्नो दंतिः प्रचोदयात् ।
ॐ तत्पपुरुषाय विद्महे महादेवाय धीमहि तन्नो रुद्रः प्रचोदयात् ।
ॐ नारायणाय विद्महे वासुदेवाय धीमहि तन्नो विष्णुः प्रचोदयात् ।
ॐ भास्कराय विद्महे महद् द्युतिकराय धीमहि तन्नो आदित्य प्रचोदयात् ।
ॐ महालक्ष्मी च विद्महे विष्णुपत्नी च धीमहि तन्नो लक्ष्मीः प्रचोदयात् ।

# अष्टविनायक नमन







मोरया मोरया मयुरेश्वरा मोरया ।
मोरया मोरया चिंतामणी मोरया ।
मोरया मोरया सिद्धिविनायक मोरया ।
मोरया मोरया महागणपती मोरया ।
मोरया मोरया विघ्नेश्वरा मोरया ।
मोरया मोरया गिरजीत्मज मोरया ।
मोरया मोरया वरदविनायक मोरया ।
मोरया मोरया बल्लाळेश्वर मोरया ।
मोरया मोरया अष्टविनायक मोरया ।
मोरया मोरया गणपती बाप्पा मोरया ।











# कालभैरव अष्टकम

देवराजसेव्यमानपावनाङ्घ्रिपङ्कजं व्यालयज्ञसूत्रमिन्दुशेखरं कृपाकरम
नारदादियोगिवृन्दवन्दितं दिगंबरं काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे।।१।।
भानुकोटिभास्वरं भवाब्धितारकं परं नीलकण्ठमीप्सितार्थदायकं त्रिलोचनम ।
कालकालमंबुजाक्षमक्षशूलमक्षरं काशिका पुराधिनाथ कालभैरवं भजे।।२।।
शूलटङ्कपाशदण्डपाणिमादिकारणं श्यामकायमादिदेवमक्षरं निरामयम ।
भीमविक्रमं प्रभुं विचित्रताण्डवप्रियं काशिका पुराधिनाथ कालभैरवं भजे ।।३।।
भुक्तिमुक्तिदायकं प्रशस्तचारुविग्रहं भक्तवत्सलं स्थितं समस्तलोकविग्रहम ।
विनिक्वणन्मनोज्ञहेमकिङ्किणीलसत्कटिं काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे
।।४।। धर्मसेतुपालकं त्वधर्ममार्गनाशकं कर्मपाशमोचकं सुशर्मदायकं विभुम ।
स्वर्णवर्णशेषपाशशोभिताङ्गमण्डलं काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे ।।५।।
रत्नपादुकाप्रभाभिरामपादयुग्मकं नित्यमद्वितीयमिष्टदैवतं निरञ्जनम ।
मृत्युदर्पनाशनं कराळदंष्ट्रमोक्षणं काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे ।।६।।
अट्टहासभिन्नपद्मजाण्डकोशसन्ततिं दृष्टिपातनष्टपापजालमुग्रशासनम ।
अष्टसिद्धिदायकं कपालमालिकन्धरं काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे
।।७।। भूतसङ्घनायकं विशालकीर्तिदायकं काशिवासलोकपुण्यपापशोधकं
विभुम ।नीतिमार्गकोविदं पुरातनं जगत्पतिं काशिकापुराधिनाथ कालभैरवं भजे
।।८।। कालभैरवाष्टकं पठन्ति ये मनोहरं ज्ञानमुक्तिसाधनं विचित्रपुण्यवर्धनम
। शोकमोहदैन्यलोभकोपतापनाशनं ते प्रयान्ति कालभैरवाङ्घ्रिसन्निधिं ध्रुवम
।।९।।


|| वास्तु योग्य, जीवन समृद्ध ||
वास्तु
उंबरठा
उत्तर
दक्षिण
वास्तु मार्गदर्शन • वास्तुशांती • ज्योतिष सेवा
वास्तुशास्त्रानुसार उंबरठा बनवून मिळेल
वास्तुनुसार डिझाईन केलेले उंबरठे सकारात्मक ऊर्जा वाढवतात आणि घराला समृद्धी देतात.
वास्तु व्हिजिट & वास्तु परीक्षण
तुमच्या घर, ऑफिस, दुकानाची वास्तु पाहून योग्य मार्गदर्शन आणि उपाय.
वास्तुशांती विधी
घर, ऑफिस, दुकानासाठी वास्तुशांतीचे संपूर्ण विधी नियोजन व आयोजन.
जन्मपत्रिका बनवून मिळेल
जन्मतारीख, वेळ व ठिकाणानुसार अचूक आणि सविस्तर जन्मपत्रिका तयार केली जाईल.
राशी व समस्येनुसार रत्न & क्रिस्टल ब्रेसलेट
तुमच्या राशी, ग्रहदोष व समस्येनुसार योग्य रत्न व क्रिस्टलचे Customized Bracelet मिळतील.
घर | ऑफिस दुकान | व्यवसाय मार्गदर्शन
निवास, व्यवसायिक व औद्योगिक ठिकाणांसाठी वास्तुनुसार योग्य मार्गदर्शन व उपाय.
वास्तुचे संपूर्ण समाधान – एका ठिकाणी!
सकारात्मक ऊर्जा
धन, समृद्धी
कुटुंबातील सुख-शांती
आरोग्य, आनंद
यश, प्रगती
अधिक माहितीसाठी
आजच संपर्क करा!
91120 17191
घर | ऑफिस | दुकान | व्यवसाय
सर्वांसाठी सेवा उपलब्ध
ॐ